परिपत्रक क्र. ३५/२०२१

जा.क्र. झो.पु.प्रा./सनि/ /२०२१
दिनांक :७/०८/२०२१

विषय: महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ (ई)च्या तरतूदींन्वये १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदनिका/ गाळ्यांचे हस्तांतरण करणेबाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१, चे कलम ३ (ई) व झोपुप्रा पुणे विशेष नियमावली दिनांक ११/०९/२०१४ मधील एस आर ७(३),७(४) मधील तरतुदीनुसार पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांच्या/गाळ्यांच्या हस्तांतरणावर निर्बंध असून अशा सदनिका/गाळा, सदनिकाधारकांना/ गाळेधारकांना वाटप केलेल्या दिनांकापासून १० वर्षाच्या कालावधीत विक्री, देणगी, अदलाबदल, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरणास प्रतिबंध करण्यात आला आहे व १० वर्षे कालावधीनंतर विहित कार्यपध्दतीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची परवानगी घेऊन अशा सदनिका/गाळा हस्तांतरण करण्यास अनुमती देण्याची तरतूद आहे. या संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशामध्ये पुनर्वसन सदनिकांचे १० वर्षानंतर हस्तांतरण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आवश्यक असल्यास राज्य शासनाशी परामर्श करुन कार्यपध्दती निश्चित करावी असे आदेश दिले होते. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सदर हस्तांतरणाची कार्यपध्दती निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पात्र झोपडीधारकास सदनिका / गाळा शासन धोरणानुसार त्याच्या वैयक्तिक आजीवन वास्तव्यासाठी / व्यवसायासाठी मोफत उपलब्ध करुन दिलेला असतो. त्याचा स्वत:साठी उपयोग सोडून त्यांचेकडून सदरच्या सदनिकेची/ गाळ्याची विक्री होताना त्या सदनिकेची / गाळ्याची बाजारभावाने किंमत निश्चित होणार असल्यामुळे सदर विक्रीव्यवहारावर शासनास हस्तांतरण शुल्क मिळणे क्रमप्राप्त आहे.

Scanned with OKEN Scanner